पुर्व सुचना नोटीस

दिनांक : ३०/०४/२०२५

प्रति,

मा. डॉ. हेमंत वसेकर,

प्रकल्प संचालक, स्मार्ट प्रकल्प, पुणे

(Principal Employer under CLA Act 1970)

**विषय :- मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत, Procurment Officer-VSTF & Procurment Officer-PIU निवड यादी स्थगित करणेबाबत.**

संदर्भ :- १) T&M Services Consulting Private Limited, Mumbai यांचा ई-मेल दि. १८/०३/२०२५

२) माझे पत्र / निवेदन दिनांक १९/०३/२०२५

३) माझे पत्र / निवेदन दिनांक २७/०३/२०२५

४) माझे पत्र / निवेदन दिनांक ०४/०४/२०२५

५) Standard From of Contract Consultant Services (Lum-sum) dt. ३०/०८/२०२२

६) माझे पत्र / निवेदन दिनांक २१/०४/२०२५

७) www.smart-mh.org संकेतस्थळावर प्रसिध्द निकालपत

८) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने सविनय सादर करण्यांत येते की, मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत, आवश्यक पदांसाठी T&M Services Consulting Private Limited, Mumbai यांचे मार्फत पद भरती राबविण्यांत आली आहे. सदर पद भरतीमध्ये मी "संपादन अधिकारी" या पदासाठी Online पध्दतीने अर्ज सादर केला आहे. सदर पदासाठी निर्धारित शैक्षणीक अर्हता, वय व अनुभव इ. अटींची परिपूर्ण पुंतता मी केलेली आहे. संदर्भ क्रं. १ चे ई-मेल व्दारे T&M Services Consulting Private Limited, Mumbai यांनी सदर पद भरती प्रक्रियेमध्ये माझा अर्ज "Cancellation of candidature for the post of Procurement Officer RIU & VSTF" केला असून, त्यामध्ये अर्ज अपात्र करण्याचे कारण पुढील प्रमाणे नमुद केले आहे "As per your previous employment with T&M Services Consulting Pvt LTD & deployed to SMART Project, your Services has been terminated/Discontinued from our end therefore, we can॰t consider your application applied for the Same project for the post of Procurement Officer RIU & VSTF."

अशाच पध्दतीने यापुर्वी सुध्दा दिनांक ०५/०२/२०२४ रोजी, T&M Services Consulting Private Limited, Mumbai यांनी मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत, कंत्राटी पद भरतीच्या अनुषंगाने माझा अर्ज नाकारून मला रोजगाराच्या संधी पासून वंचित ठेवण्याचे कार्य केले आहे. याबाबत जवळपास स्मार्ट प्रकल्प आणि T&M यांना एकुण १० स्मरणपत्रे निर्गमित केले आहेत. परंतू, प्रकल्पा मार्फत व संबंधीत संस्थे मार्फत कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद किंवा उत्तर मला प्राप्त झाले नाही. त्याची सविस्तर तपशिल सोबत सहपत्रित केला आहे. तदसमयी, झालेल्या अन्याया विरूध्द न्यायालयात याचिका दाखल करण्यासाठी आर्थिक अडचणीमुळे शक्य झाले नाही.

संदर्भ क्रं. १ चे ईमेल व्दारे, T&M Services Consulting Private Limited, Mumbai यांनी सदर पद भरती प्रक्रियेमध्ये माझा अर्ज नाकारण्याबात नमुद केलेले कारण हे, भारतीय संविधानिक तरतूदी, मा. सर्वेच्य न्यायालय, मा.उच्च न्यायालय, मा.कामगार न्यायालय यांनी वेळो-वेळी निर्गमित केलेल्या न्याय निवाडयाचे अनुषंगाने पूर्णत: असंयुक्तीक आहे. तसेच, अशी कोणतही तरतूद प्रकल्पांतर्गत उपलब्ध नाही.

T&M Services Consulting Pvt LTD यांचे व्दारे होणारे कृती मुळे भारतीय संविधानिक तरतूदी, मा. सर्वेच्य न्यायालय, मा.उच्च न्यायालय, मा.कामगार न्यायालय यांनी वेळो-वेळी निर्गमित केलेल्या न्याय निवाडयाचे व The Contract Labor (Regulation and Abolition) Act,१९७० चे उल्लंघन होत असून, याबाबत मा.प्रकल्प संचालक, स्मार्ट प्रकल्प, पुणे (Principle Employer) यांचेकडे वेळो-वेळी पाठपूरावा करून कांहीच कार्यवाही होत नाही किंवा कोणते उत्तर ही प्राप्त झालेले नाही.

संदर्भ क्रं. ४ चे, Standard From of Contract Consultant Services (Lum-sum) dt. ३०/०८/२०२२ चे अवलोकन केले असता हे स्पष्ट होते की, प्रकल्पांतर्गत कंत्राटी कर्मचारी यांचे नियुक्ती व सेवा समाप्तीच्या बाबतीत प्रचलित कामगार कायदे, नैसर्गिक तत्वे आणि जागतिक बँकेचे anti-corruption मार्गदर्शक सुचनांचे पालन करणे बंधनकारक आहे. तसेच, T&M Services Consulting Pvt LTD यांचे प्रत्येक क्रियाकल्पाचा आढावा व मुल्यांकन करण्याची जाबाबदारी Review & Reporting Committee यांची आहे. त्याची प्रत सोबत जोडण्यांत आलेली आहे. संबंधीत T&M Services Consulting Pvt LTD यांनी संदर्भ क्रं. ४ चे करारमधील अटी व शर्तींचा भंग केलेला आहे.

आज अखेर पर्यंत सदर कामी आपणाकडे केलेल्या प्रत्येक पत्रव्यवहारास आपणा मार्फत कोणतेही उत्तर देण्यांत आले नाही, किंवा सदर प्रकरणी उचित चौकशी करणे किंवा संबंधीत संस्थे विरूध्द कार्यवाही करण्यांत आली नाही, ही कृती अनुचित कामगार प्रथांमध्ये मोडणारी आहे. तसेच, प्रकल्पा मार्फत अशा अनुचित कामगार प्रथांचे बाबत विहित मुदतीत उचित कार्यवाही होत नसल्यामुळे, संबंधीत संस्थेस अनुचित कामगार प्रथांचा अवलंब करण्यास पाठमिळत आहे.

यापत्राव्दारे, माझी आपणास विनंती आहे की, संदर्भ क्रं. ६ अन्वये, सदरच्या पद भरतीची निवड यादी या पत्राव्दारे, प्रसिध्द करण्यांत आलेली आहे. वास्तविक पहता, माझे संदर्भ क्रं. १ ते ५ अन्वये, करण्यांत आलेल्या निवेदनाची कोणतीही दखल न घेता अनियमित व बेकायदेशिर पध्दतीने सदरची भरती प्रक्रिया झाली आहे. सदरच्या पद भरती प्रक्रिये दरम्यान, संपादन अधिकारी पदासाठी माझा अर्ज नाकारण्याबाबत T&M Services Consulting Private Limited यांनी केलेल्या कृतिची सखोल चौकशी करण्यासाठी "चौकशी समिती" स्थापना करण्यांत यावी. तसेच, सदर चौकशी समितीचा अहवाल प्राप्त होत नाही तदपर्यंत संदर्भ क्रं. ६ अन्वये, निर्गमित निकालपत्रातील Procurment Officer-VSTF & Procurment Officer-PIU निवड यादी स्थिगित तात्काळ करण्यांत यावी, ही विनंती. पुढील ५ दिवसांत याबाबत उचित कार्यवाही न झाल्यास, मला नाईलाजास्तव मा. न्यायालयात दाद मागणे भाग पडेल.

तसेच, असे ही, सादर करतो की, दिनांक २०/०७/२०२३ रोजी, असंविधानिक पध्दतीने माझे सेवा समाप्त केल्या पासून, मला व माझे कुटुंबास अनावाश्यकरित्या मोठया प्रमाणावर सामाजिक, मानसिक, आर्थिक अडचणींना समोरे जावे लगाले आहे. वास्तविक पहाता, प्रकल्पाचे Principle Employer या नात्याने बहुतांश प्रश्न हे प्रकल्प स्तरावर न्यायोचित पध्दतीने सोडले जाऊ शकता, परंतू प्रकल्पस्तरावर त्याची कोणतीही दखल न घेतल्यामुळे, न्यायालयाचा मार्ग अवलंबने भाग पडते. यामुळे आम्हा अर्जदारास प्रचंड मानसिक व आर्थिक अडचणींचा समना करावा लागतो. वास्तविक पहाता, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अन्वये, शासकीय कार्यालयास प्राप्त झालेल्या अर्जावर सात दिवसांत प्रतिसात / उत्तर देणे बंधनकारक आहे. परंतू, स्मार्ट प्रकल्पांतर्गत सदर अधिनियमांतर्गत नमुद तरतूदींचे सुध्दा मोठया प्रमाणावर उल्लंघन होत आहे. यामुळे सध्यस्थितीस स्मार्ट प्रकल्पाबाबत नागरिकांमध्ये / जनमानसामध्ये अत्यंत नकारात्मक दृष्टीकोन निर्माण झालेला आहे, ही बाब प्रकर्षाने आपले निदर्शनास आणून देत आहे.

तरी कृपया, प्रस्तुत प्रकारणी कोणताही पूर्वग्रह न बाळगता, संवेदनशिल दृष्टीकोण ठेऊन व भारतीय संविधानिक तरतूदींचा आदार करून न्यायोचित कार्यवाही करून मला न्याय मिळावा ही, हात जोडून आपणास नम्र विनंती आहे.

Sunil VS

(सुनिल विजय शेलार)
प्लॉट क्रं. ५८ अ, PMT कॉलनी,
बिबवेवाडी, पुणे-३७

**<u>प्रत, माहिती व उचित कार्यवाहीसाठी सविनय सादर.</u>**

१) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (cs@maharashtra.gov.in)
२) मा. अपर मुख्य सचिव, कृषि, मंत्रालय, मुंबई (acs.agri@maharashtra.gov.in)
३) मा. प्रशासकीय अधिकारी, स्मार्ट प्रकल्प, पुणे (admpcmu.smart@gmail.com)
४) मा. कामगार उप-आयुक्त, संगमवाडी, पुणे - ४११ ००३ (dyclpune२०२३@gmail.com)
५) मा. व्यवस्थापक, T&M Services Consulting Private Limited, Mumbai (hr२००@tnmhr.com)